Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

27

# स्त्री-लिखित! कविता (सन २०११ ते २०२०)

**डॉ. विनोद वा. उपर्वट**
**मार्गदर्शक**
कला व वाणिज्य महाविद्यालय, देवपूर, धुळे

**नीला विजय कदम,**
पीएच.डी विद्यार्थिनी,
एस.एन.डी.टी, चर्चगेट, मुंबई

---

**प्रस्तावना :**

अर्वाचीन मराठी स्त्रीकाव्याचा विचार करताना स्त्री शिक्षणाच्या प्रवर्तक सावित्रीबाई फुले यांच्या पहिल्या काव्यसंग्रहाचा (‘काव्यफुले’सन १८५४) विचार करावा लागतो. स्त्रियांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत, त्यांना जागृत करण्याचे कार्य सावित्रीबाईंच्या कवितेने केले आहे.

‘अभिमानाने जगण्यासाठी शिकून घ्या, जा शाळेला
जमेल तेव्हा झाडणं, पुसणं, हात लावा, घरकामाला. जा आधी शाळेला.’

अभिमानाने जगण्यासाठी, स्वत:चा विकास साधण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे हे सांगताना, जा ‘आधी’ शाळेला अशी द्विरुक्ती त्या करतात. त्या काळात घरातील सर्व कामांची जबाबदारी स्त्रियांकडे असे, जमेल तेव्हा घरकामाला हात लावा, असे म्हणत त्या शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करतात.

पुढील सन १८५० ते २००० या कालखंडात कवयित्रींच्या कवितेत अनेक स्थित्यंतरे झाली. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दोन दशकांमध्ये एकूणच कविता आमूलाग्र बदलली, याला कवयित्रींची कविता अपवाद नव्हती. सन २००१ ते २०२० या कालखंडातील कवयित्रींच्या कवितांचा मागोवा घेण्यापूर्वी या परिवर्तनाची पार्श्वभूमी लक्षात घेणे उचित ठरते.

**पार्श्वभूमी :**

सन १९७५ ची बिजिंग परिषद झाल्यानंतर भारतभर स्थापन झालेली स्त्री-अभ्यास केंद्रे, स्त्री-संघटनांची स्थापना आणि स्त्रीहक्कांबाबतच्या चळवळी यांतून स्त्रीजाणिवा विकसित होऊ लागल्या. स्त्रीला समष्टीकडून होत असणाऱ्या शोषणाची जाणीव त्यापूर्वी होत नव्हती असे नाही; पण ही जाणीव व्यक्त करण्याचे धाडस तिच्या अंगी अत्यल्प होते. सन १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष आणि त्यानंतरचे महिला दशक यातून झालेल्या विचारमंथनाचे पडसाद मराठी साहित्यावर उमटले. यातून स्त्रीकाव्याचे एक नवे पर्व एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उदयास आले.

जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण यांचे परिणाम समाजावर उमटले. त्याची प्रतिक्रिया म्हणून मराठी साहित्य कमालीचे बदलले. नव्वदोत्तर काळाबाबत कवी व समीक्षक पी. विठ्ठल म्हणतात, " ‘वेग, स्थिरता, समृद्धी आणि तरीही अनिश्चितता’हे काळाचं एक सूत्र आहे. या काळात माणसाच्या विचाराचे केंद्र बदलले. नैतिकतेच्या संकल्पना बदलल्या. सामाजिक स्तरावरची तीव्र पडझड आणि भावनिक पातळीवरचे मुळापासून कोसळणे यातून कौटुंबिक विसंवादासह एकूणच मानवी अस्तितवाचे जे प्रश्न निर्माण झाले. त्या अनेक प्रश्नांवर नव्वदोत्तरी कवितेने भाष्य केले.”[२] स्त्रियांची मराठी कविता आत्मप्रकटीकरणाचे समर्थ माध्यम असल्याचे निदर्शनास आले. स्त्रीवादी कवितेचा नवीन प्रवाह निर्माण झाला.

समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादी स्तरातील स्त्रिया कवितेतून अभिव्यक्त होऊ लागल्या. सन २००१ ते २०१० या काळातील कवितेबाबत समीक्षक सुजाता शेणई म्हणतात, "परंपरा आणि नवता यांच्या संघर्षात परंपरेला नाकारण्याकडे कवयित्रींचा कल आहे. अनुभवाला साजेशी भाषा वापरण्याचा प्रयत्न असून त्यातही धीटपणा आलेला आहे. आत्मभानाचे क्षितीज व अनुभवाचा परीघ रुंदावल्याने कविता विस्तारली.”[३] समाजातील अनेकविध क्षेत्रात स्त्री कार्यरत झाल्याने कवयित्रींना जीवनाचे नवे भान प्राप्त झाले. अनेक वर्षे काव्यलेखन करणाऱ्या कवयित्रींबरोबर नव्याने लिहू लागलेल्या कवयित्रींची कविता आत्मभानाने सामोरी आली.

एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकातील स्त्रियांच्या कवितेची समीक्षा करताना त्या म्हणतात, "परंपरेला जपताना नवतेला सांभाळणारी, आधुनिकतेला सामोरी जाणारी, समकालिनतेशी नाते जोडणारी, अभिव्यक्तीला न्याय देऊन प्रयोगशीलतेला सांभाळणारी अशा अनेक घटकांनी युक्त असलेली कविता या दशकातील कवयित्रींच्या संग्रहातून दिसून येते.”[४]

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved 

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

अश्विनी घोंगडे, अनुराधा पाटील, मलिका अमर शेख, अरुणा ढेरे, प्रतिमा इंगोले, आसावरी काकडे, नीरजा, प्रज्ञा दया पवार, कविता महाजन, नीलिमा गुंडी, सिसिलिया कार्व्हालो, अनुपमा उजगरे, उषा मेहता, नीलम माणगावे, विजया जहागीरदार, शैला लोहिया, कल्पना दुधाळ, संध्या रंगारी, उषा खंदारे, संघमित्रा खंडारे, योगिनी सातारकर-पांडे, वेदिका कुमारस्वामी, दिशा पिंकी शेख, बालिका ज्ञानदेव, पद्मरेखा धनकर आणि इतर अनेक कवयित्रींचे योगदान या काळातील कवितेला लाभले. त्यांचे अनेक काव्यसंग्रह प्रकाशित झाले, ज्यातील आशयसूत्रे लक्षवेधक आणि अंतर्मुख करायला लावणारी आहेत. शब्दमर्यादेसाठी निवडक आशयसूत्रे आणि कवयित्रींचा उल्लेख करीत आहे; त्याखेरीज इतर अनेक कवयित्री आणि काव्यातील आशयसूत्रे यांचा प्रभाव या काळावर निश्चितपणे आहे.

**जगण्याच्या डोळस आकलनातून आलेले स्त्रीभान**

समाज व्यवस्थेतील राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक अशा सर्व स्तरांवर स्त्रीची वर्षानुवर्षे पायमल्ली झालेली आहे. जगण्याच्या डोळस आकलनातून तिला जे स्वभान प्राप्त झाले, ते या कालखंडातील कवयित्रींच्या काव्यातून प्रतीत होते. आता तथाकथित स्त्रीपणाची सारी बंधने झुगारून फक्त स्वत:चे, स्वत:च्या मनाने घातलेले बंधन पाळण्याची धिटाई तिच्याकडे आली आहे. तिला कुठल्याही राजाची राणी बनून राहायचे नाही.

"मला माझ्याच स्वत:च्या साम्राज्याची साम्राज्ञी बनायचे असते.
मला माणूस म्हणून जगायचे असते."[५]

कुठल्याही बंधनात, चौकटीत अडकण्यापेक्षा 'माणूस' म्हणून जगण्यातला अर्थ आता तिला समजला आहे.

'स्त्री असण्याचा अर्थ' या कवितासंग्रहाच्या मनोगतात आसावरी काकडे लिहितात, 'चिवटपणे तग धरून, धैर्याने कृतिशील राहत, सर्जक आनंदाचा शोध घेत जगता येणे हे स्त्रीचे खरे सामर्थ्य आहे.'[६]

'स्त्रीचा देह असणं
म्हणजे स्त्री असणं नाही
स्त्री असणं म्हणजे
सर्जक आनंदाचा शोध घेत जगणं, जगवणं'[७]

संहाराला रोखून धरण्याची ताकद स्त्रीमध्ये असते. तितकीच ती संवेदनशील, सहवेदना जाणणारी असते. पुरुषातले पुरुषपण निभावणारी असते. अशाप्रकारे स्वत:मधील सामर्थ्य, क्षमता यांची जाण स्त्रीला आली आहे.

**समाजव्यवस्थेला जाब विचारणारी कविता**

या कालखंडातील कवयित्रींना स्वत:तील 'माणूस'पण गवसले आहे. समष्टीतील स्त्रीजीवन सजगतेने न्याहाळत 'तो' आणि 'ती' यांची तुलना तिचे मन करीत आहे. यातून स्त्रीच्या जगण्याचे आणि अस्तित्वाचे सत्व कुठे शोधावे, हा प्रश्न कवयित्रींना पडतो. हे प्रश्न वैयक्तिक पातळीवर न राहता कवितेतून भवतालातील सर्व स्त्रियांना कवेत घेतात. कवयित्री कविता महाजन जाब विचारतात,

'अंगभर गुंडाळून ठेवलेलं स्त्रीत्व
खरंच इतकं जाडभरडं असतं का,
की त्यातून दिसतच नाही
आपलं आतलं माणूस असणं?'[८]

स्त्रीही माणूस आहे, हे समजून न घेणाऱ्या समाजव्यवस्थेसाठी हा प्रश्न आहे.

संशयाची भूते मानगुटीवर ठेवणारा पुरुष स्वत: स्वच्छंदीपणे जीवन जगत राहतो; मात्र पत्नीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवून तिला दूषणे देत असतो. संतापाने चवताळलेल्या स्त्रीभोवती असणारे आत्मभानाचे व आत्मसन्मानाचे वलय प्रश्नांकित होते.

'मला एवढंच सांग
सेकन्ड हॅन्ड बाईला ओळखणारा
तू फर्स्ट हॅन्ड पुरुष कसा काय रे?'[९]

दुर्वर्तनाला पुरुषार्थ समजणाऱ्या वृत्तीला कवयित्री बालिका ज्ञानदेव खरमरीत जाब विचारतात.

समाज्व्यव्यवस्थेला जाब विचारणारे प्रश्न ग्रामीण पर्यावरणातूनही उद्भवलेले आहेत. मातीतून धान्याच्या राशी मिळवण्यात आनंद मानणारा शेतकरी शासकीय योजनांमुळे धनाच्या राशींची स्वप्ने पाहू लागला. प्रचंड उत्पादनासाठी वापरणाऱ्या गेलेल्या रासायनिक कीटकनाशकांमुळे शेतजमिनींचे सत्व गेले आणि स्वत्वही गेले. मातीतून नैसर्गिकरित्या बीज रुजून येणे, दुरापास्त झाले. कवयित्री कल्पना दुधाळ कडवट भाष्य करतात,

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved

E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

'आणि माती अडून बसलीय
सिझर कर म्हणत
मी काय करू?'[१०]

समाजव्यवस्थेला निरुत्तरीत करणारा हा प्रश्न केवळ एका कवयित्रीचा, 'मी' या सर्वनामाचा, ग्रामीण पर्यावरणाचा आणि अखिल मानवसृष्टीचा नसून तो भूमितत्वाशी जाऊन भिडला आहे. या कालखंडात कवितेचा परीघ विलक्षण रुंदावला आहे.

**सनातन दु:खाचा उच्चार**

पुरुषकेंद्री रचनेमध्ये स्त्रीच्या मतांची, विचारांची आणि भावनांची गळचेपी, अवहेलना झाली आहे. आदिम काळापासून आजतागायत वेदनेचा सल तिला साथ करीत आहे. तिच्या स्मृतीत खोलवर जे साकळले आहे त्याचा उच्चार कवयित्री करतात.

'... बाई होते गाडग्यातून सांडलेली
तांदळाची कणी नाहीतर
तुटलेल्या माळेतून गळालेला मणी'[११]

सांडलेली तांदळाची कणी किंवा तुटलेल्या माळेचा मणी या गोष्टी सहजपणे पायदळी तुडविल्या जातात. त्यांची पायमल्ली होते; याचे कुणालाच भान नसते. हीच स्थिती स्त्रीच्या भावनांची, विचारांची होते. अशा जगण्याच्या आणि भोगण्याच्या दाहामुळे ती होरपळून जाते. तिचे सनातन दु:ख कवयित्री प्रिया धारूरकर शब्दांकित करतात,

'तो असतो कुंभार
ती असते त्याची गाढवी
त्यानी लादलेलं ओझं निमूट वाहते
न पेलणारं ओझं लीलया पेलते
कुंकवाची टिकली एवढी ताकद देते?'[१२]

कुंभार- गाढवीच्या रूपकातून स्त्रीजीवनाची व्यथा कवयित्री सूचित करते; त्यातून स्त्रीला दिलेले दुय्यमत्व, संसाराचे भारवाहूपण, अहोरात्र निमूटपणे राबणे आणि याशिवाय मालकाच्या बंधनात जगणे या वास्तवचित्रातून स्त्रीचे दु:ख उजागर होते.

**नकाराचा ठामपणा**

स्त्रीला आलेले आत्मभान आणि ती स्वत:साठी शोधत असलेले अवकाश यांमुळे तिच्या विचारात दृढपणा आलेला आहे. 'मला काय हवे आहे' किंवा 'काय नको आहे' यांबाबत असणाऱ्या स्पष्टतेमुळे 'नाही' म्हणण्याचे, नकार व्यक्त करण्याचे बळ तिला प्राप्त झाले.

'मी खाली सही करणार
असेही लिहून देते की,
फक्त स्त्री म्हणून
वाट्याला येणाऱ्या
भोगांची जबाबदारी
मी एकटी स्वीकारणार नाही.'[१३]

इच्छा नसतानाही परंपरा म्हणून काही गोष्टी, किंबहुना सारे आयुष्य 'का?' हा प्रश्न न विचारता स्त्रीला कराव्या लागल्या. स्वत:चे मन, इच्छा मारून जीवन जगावे लागले. या जगण्याला छेद देत कवयित्री सारिका उबाळे-परळकर कवितेतून ठामपणे प्रातिनिधिक नकार देतात.

मुलीने बालपणापासून बांगड्या-कुंकू वापरावे, या प्रथेबाबत कवयित्री अनुराधा पाटील भाष्य करतात,

'पण पुढं अबाधित राहील तिचं
हे टिकलीबांगडीचं
चिमूटभर स्वातंत्र्य...'[१४]

या प्रश्नातील भयजाणीव परंपरेतील एक छुपी दाहकता सामोरी आणते. विवाहानंतर या कुंकू-बांगड्यांचा संबंध पत्नीच्या अहवेपणाशी जोडला जातो. ही प्रथा अलीकडची स्त्री नाकारते.

'बाई नाकारते आता
रोजच्या रोज पहाटे अंघोळीनंतर

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved

स्वच्छ मोकळ्या कपाळावर कुंकू लावणं लालभडक.'[१५]

दिवसाच्या सुरुवातीलाच स्वामीत्वातून येणारा पूर्णविराम ती नाकारते.

**मिथकांचे पुनर्वाचन**

मिथकांचे तसेच इतिहास-पुराणातील पारंपरिक कथांचे पुनर्मूल्यांकन १९८० नंतरच्या काही कवयित्रींनी केले आहे. रुख्मिणी, जानकी, राधा, यशोधरा, मीरा, गांधारी अशा व्यक्तिरेखांचे पुनर्वाचन कवयित्रींच्या काव्यातून आजही होत आहे.

'मला द्रौपदीचं नवलं वाटतं
तिने वस्त्रांसाठी धावा का केला
नंतर मिळालेल्या त्या वस्त्रांनी
नेमकं काय झाकलं?'[१६]

द्रौपदी या महाभारतातील मिथकाबाबत कवयित्री जेव्हा लिहिते तेव्हा 'एकदा नग्नतेला भिडल्यानंतर परत वस्त्रांत कसं लपता येतं.' हा रोखठोक आणि वास्तववादी प्रश्न ती विचारते. 'द्रौपदीचे वस्त्रहरण' ही कोणत्याही काळातील स्त्रीच्या मनातील दुखरी नस असून त्यावर अनेक कवयित्रींनी भाष्य केले आहे. द्रौपदीचे जीवन कवयित्री मीराने 'ऐक द्रौपदी' या खंडकाव्यातून व्यक्त केले आहे.

एकविसाव्या शतकात भूमिकन्या सीता पुन्हा जन्माला येत आहे; हे सांगताना शैला लोहिया व्यक्त होतात,

'दगडी वृंदावनाचे चिरे फोडून
पुन्हा एकदा जन्माला येतेय
'भूमिकन्या' सीता
नवे रामायण लिहिण्यासाठी'[१७]

व्यासरचित रामायणापेक्षा या नव्या रामायणाची रचना वेगळी असणार आहे. हे रामायण लिहिणारी सीता ही एक स्त्री असणार आहे. दगडी चिऱ्यांमध्ये वर्षानुवर्षे घुसमटणारा तिचा श्वास मोकळा होत आहे.

**अलक्षित घटकांची कविता**

'देवदासी' या समाजात जन्माला आलेली मुलगी वेदिका कुमारस्वामी (टोपणनाव) या कवयित्रीने आपल्या बाह्य आणि आंतरिक जगातला संघर्ष 'गावनवरी'[१८] या दीर्घकवितेतून मांडला आहे. देवाला वाहिलेल्या स्त्रीला पुरुषप्रधान धर्मसत्तेने गावाचीच नवरी बनवल्यावर तिच्या वाट्याला जे भोग येतात, त्याचे चित्रण या संग्रहात आहे. सर्वसामान्य कुटुंबात उच्च जात व वर्ग या चौकटीत राहणाऱ्या स्त्रियांचे जगणे व या चौकटीच्या बाहेर राहणाऱ्या स्त्रियांचे जगणे, समस्या आणि त्यातील विचारांचे अंतर या काव्यातून व्यक्त होते. 'गावनवरी' या शीर्षकापासून ते कवितेतून सामोऱ्या येणाऱ्या आत्मशोधापर्यंत व्यक्त झालेला संघर्ष मन हादरविणारा आहे.

८ मार्च २०२१ या जागतिक महिला दिनाच्या दिवशी तृतीयपंथी (ट्रान्सपर्सन) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कवयित्री दिशा पिंकी शेख यांचा 'कुरूप' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. 'परिघाबाहरचे अस्पर्शित अनुभव सामान्य माणसाला व्यथित करतानाच दृष्टीतही बदल घडवतात हेच या संग्रहाचे यश आहे.'[१९]

'हात थकले बाई टाळ्या वाजवून
जीव दमला ऊन, वारा, पाऊस
तरी भेटेना मया जिवा इज्जतीचा त्यो घास
ज्याला मया घामाच्या अत्तराचा वास'[२०]

सर्वसामान्य माणूस कष्ट करून, घाम गाळून पैसे कमवतो आणि सुखाचे दोन घास खातो. पोटाची टिचभर खळगी भरण्यासाठी टाळ्या वाजवून हात थकतात; पण इज्जतीने जगता येत नाही, घाम गाळून पोट भरता येत नाही; ही कवयित्रीची व्यथा आहे. तृतीयपंथियांना दूर ठेवणारी, त्यांच्या जीवनाबाबत उदासीन असणारी समाजव्यवस्था आणि त्यातून तृतीयपंथीयांच्या वाट्याला आलेले जीवन यामुळे मन सुन्न होते.

उषाकिरण अत्राम (म्होरकी, लेखणीच्या तलवारी), कुसुम आलाम (रान आसवांचे तळे, रानपाखरांची माय) या कवयित्रींनी आदिवासी समाज आणि संस्कृतीचे वास्तव कवितांमधून सामोरे ठेवले आहे.

**समकालिनतेशी नाते**

एकविसावे शतक हे ग्लोबल युग आहे. संगणक, इंटरनेट, मोबाईल, मोबाईलवरील अॅप, मॉल संस्कृती आणि भौतिक सुखांचा हव्यास ही या युगाची देन आहे. याचा परिणाम समकालीन कवयित्रींवर निश्चितपणे झाला आहे. 'जो आपल्या जगण्याच्या काळाला

E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

जागरूकपणे सामोरा जातो, त्याचे भान राखतो तो समकालीन लेखक असतो.' असे ज्येष्ठ समीक्षक निशिकांत ठकार यांनी म्हटले आहे. काही कवयित्रींच्या कवितांमधून हे समकालीन भान निश्चितपणे सांभाळले गेले आहे.

दूरदर्शनसमोर बसून किंवा मोबाईलवर वेबसिरीज पाहत खाणे-वाचणे ही आजची वस्तुस्थिती आहे. कवयित्री वर्षा ढोके-सय्यद लिहितात,

'ब्रेकिंग न्यूजची
चटपटीत दुकानं
आपापल्या चवीचे
गुंगी आणणारे मसाले टाकून
कोंबतात माझ्या तोंडात
गुंगीतही मला जाणवतं
माझी भूक हायजॅक केली जातेय.'[२२]

झगमगाटी दुनियेत सर्वदूर अनेक क्षेत्रात स्त्री कार्यरत आहे. मोठमोठे मॉल्स, कार्पोरेट ऑफिसेस, सरकारी-खाजगी संस्था, इंडस्ट्रीज इत्यादी ठिकाणी उच्च पदस्थ अधिकारी ते सफाई कामगार अशा विविध भूमिका ती बजावते; पण तिच्याकडे माणूस म्हणून पाहण्याऐवजी 'बाई' म्हणून नजर फिरविणे, ही विकृत प्रवृत्ती समाजात आजही कायम आहे. हे वास्तव कवयित्री योगिनी राऊळ यांना अस्वस्थ करते.

'इंडस्ट्रीचे प्रॉफीट म्हणजे
तिचं शरीर घुसळून काढलेलं दर्जेदार लोणी'[२३]

या काळातील काही कवयित्री समकाळातल्या आपल्या जगण्याचे पुनर्मुल्यांकन करीत नव्या भाषेतून आणि स्त्री प्रतिमेतून स्वत:च्या अस्तित्वाचा शोध घेत आहेत. भाषेचे, शैलीचे प्रयोग करताना आजच्या काळाची भाषा मिंग्लीश (मराठी+इंग्लिश) वापरली जात आहे. उदा. एक्स्पायर्ड, सुपरवुमन, चीअरगर्ल, वाईफ, फ्लुरोसंट, युनिसेक्स, मेकओव्हर, प्लांटेशन, लिवइन, फोकस असे कितीतरी शब्द कवयित्रींच्या अभिव्यक्तीचा भाग झाले आहेत.

नियतकालिके, दिवाळी अंक यांबरोबरच समाजमाध्यमांमुळे कवितेचे क्षेत्र विस्तारले आहे. मंचीय कविता, फेसबुक कविता, दिनविशेष कविता (महिलादिन, पर्यावरण दिन इ.) या निमित्ताने कवितालेखन केले जात आहे.

**समारोप**

एकविसाव्या शतकातील सुरुवातीच्या या दोन दशकात स्त्रीचे कार्यक्षेत्र, अनुभवविश्व, नववाटांचा शोध घेणारी वृत्ती आणि विचारांचा अन्वयार्थ लावण्याची रीत यांचा परीघ रुंदावला आहे. तिचे स्वभान समष्टीशी जोडले गेल्याने त्याचे पडसाद कवितेत उमटू लागले आहेत. 'माणूस'पणाचा तिचा प्रवास कवितेतून व्यक्त होत आहे. या माणूसपणाच्या प्रवासात पुरुष तिच्या साथीला असावा, हा विचार काव्यभिव्यक्तीचा एक भाग होऊ शकतो. पुरुषाची स्त्रीकडे पाहण्याची मानसिकता बदलत आहे आणि बदलणार आहे. हे चित्र कवितेतून म्हणावे इतके अभिव्यक्त झालेले नाही.

एकमेकांच्या मतांचा, विचारांचा, भावनांचा, गरजांचा आणि माणूसपणाचा विचार करून जगण्याच्या कविता लिहिणे, हे सशक्त मराठी कवितेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. स्त्रीपुरुष समानता हे एक शाश्वत मूल्य आहे. त्याच्याकडे डोळसपणे पाहून काव्यरचना झाली तर समाजस्वास्थ्यासाठी ते फलदायी ठरू शकेल.

**संदर्भ सूची :**

१) सावित्रीबाई फुले, 'काव्यफुले, १८५४
२) पी. विठ्ठल, 'मराठी कविता समकालीन परिदृश्य', कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१९, पृ. ६०-६१
३) सुजाता शेणई, 'काव्य', स्त्री साहित्याचा मागोवा - खंड ४, संपा. मंदा खांडगे व इतर, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, २०१५.
४) सुजाता शेणई, 'काव्य', स्त्री साहित्याचा मागोवा - खंड ५, संपा. मंदा खांडगे व इतर, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, २०२४.
५) अंजल कुलकर्णी, बदलत गेलेली सही, ग्रंथाली, मुंबई, २००९
६) आसावरी काकडे, 'स्त्री असण्याचा अर्थ', सेतू प्रकाशन, पुणे २००६
७) तत्रैव

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V


८) कविता महाजन, ''तत्पुरुष', तुला प्रकाशन, औरंगाबाद, २००५.
९) बालिका ज्ञानदेव, मॅगझिनीतून सुटतेय गोळी, लोकवाङ्मयगृह, मुंबई, २०१४
१०) कल्पना दुधाळ, 'सीझर कर म्हणतेय माती', हर्मिस प्रकाशन, पुणे २०१०.
११) माया पंडित, 'तल्लखी', शब्द प्रकाशन, मुंबई, २०१८
१२) प्रिया धारूरकर, 'विदेही', श्री विद्या प्रकाशन, पुणे, २००७
१३) सारिका उबाळे, पळकर, 'शिर:स्नाता', २०१६
१४) अनुराधा पाटील, 'वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ', तुला प्रकाशन, औरंगाबाद, २००५.
१५) कविता महाजन, 'तत्पुरुष' तुला प्रकाशन, औरंगाबाद, २००५
१६) प्रिया जामकर, 'बिंदूत खूप जागा आहे'. कॉपर कॉईन पब्लिशिंग, दिल्ली २०१८.
१७) शैला लोहिया, कविता गजाआडच्या, पवन प्रकाशन, परभणी, २००२.
१८) वेदिका कुमारस्वामी, 'गावनवरी', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई २०१८.
१९) सुजाता शेणई, 'काव्य', स्त्री साहित्याचा मागोवा - खंड ५, संपा. मंदा खांडगे व इतर, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, २०२४.
२०) दिशा पिंकी शेख, 'कुरूप', शब्द पब्लिकेशन्स, बोरिवली, मुंबई, २०२१.
२१) निशिकांत ठकार, 'साहित्याचा परिघ', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००१.
२२) वर्षा ढोके-सय्यद, 'अनागोंदीच्या नोंदी', विजय प्रकाशन, नागपूर, २०१९.
२३) योगिनी राऊळ, मुखवटा उतरल्यावर, संवेदना प्रकाशन, पुणे २०१९